(In Camera) निशाणी क्र.१९

**अर्जदाराचा उलटतपास जाबदेणार क्र.१ ते ५ तर्फे वकील श्री. ए.एस.धारुरकर यांच्यामार्फत शपथेवर सुरु-**

**१२.** हे खरे की, जाबदार क्र.१ व माझे लग्न बारामती येथे झाले होते. हे खरे नाही की, ते लग्न मुलाकडच्यांनी करायचे ठरले होते. हे खरे नाही की, लग्नाचा संपुर्ण खर्च हा माझे सासरे म्हणजेच जाबदेणार क्र.२ यांनी केला. मी लग्नाचा खर्च आम्ही केला असे दाखविणारी बिले न्यायालयात दाखल केलेली नाहीत. साक्षीदार सांगतात की, लग्नाचा खर्च करण्यासाठी माझ्या वडिलांनी माझ्या सासऱ्यांना पैसे दिले. हे खरे की, तसे माझ्या अर्जात नमुद नाही. हे खरे नाही की, माझ्या वडिलांनी माझ्या सासऱ्यांना पैसे दिले नसल्याने अर्जात तसे नमुद नाही. हे खरे की, माझ्या वडिलांकडे शेती आहे. हे खरे नाही की, मी लग्नाआधी शेतात काम करायचे. हे खरे की, जाबदेणार यांनी लग्नात मला सोन्याचे दागिने घातले होते. हे खरे नाही की, माझा लग्नाचा बस्ता देखील जाबदेणार यांनी घेतला. मला जाबदेणार यांनी एक चेन व अंगठी दिली होती. हे खरे नाही की, ती चेन व अंगठी आजरोजी माझ्याकडे आहे.

**१३.** हे खरे की, माझे लग्न कोरोना काळामुळे कमी लोकांत केले होते. हे खरे नाही की, लग्नात केवळ १०० लोक उपस्थित होते. हे खरे नाही की, लग्नात जास्त नातेवाईक माझे आले होते. हे खरे नाही की, लग्नानंतर १५-२० दिवस मी सासरी व्यवस्थित राहिले. हे खरे नाही की, लग्नानंतर माझ्याकडे मोबाईल होता. हे खरे नाही की, लग्नानंतर माझी खुशाली कळवायला मी आई-वडिलांना सारखी फोन करायचे. हे खरे नाही की, घरात तीन महिला असल्याने आम्ही कामे वाटुन घ्यायचो. हे खरे नाही की, मी लग्नानंतर काम न करता केवळ खोलीत बसुन रहायचे. हे खरे नाही की, मी माहेरी गेल्यावर २० दिवस माहेरीच रहायचे. हे खरे नाही की, मी जाबदेणार यांचेसोबत विनाकारण भांडण काढायचे. हे खरे नाही की, माझा स्वभाव रागीट आहे. हे खरे नाही की, मी जाबदेणार यांना उलट-सुलट बोलायचे. हे खरे नाही की, तरीदेखील जाबदेणार मला समजुन घ्यायचे.

**१४.** माझ्या पतीला ६० हजार रुपये पगार असल्याबाबत कागदोपत्री पुरावा मी दाखल केलेला नाही. हे खरे की, रॉकेल विक्री आता कोठेही चालू नाही. मी जाबदेणार यांच्या

प्लॉटींगच्या व्यवसायाबाबत कोणताही पुरावा दाखल केला नाही. माझ्या नणंदेच्या कामाबाबत पुरावा दाखल केलेला नाही. साक्षीदार सांगते नणंद पुर्वी कामाला होती व आता तिचे लग्न झाले आहे. तिचे लग्न कधी झाले मला माहिती नाही. हे खरे की, त्यावेळी मी माहेरी होते.

**१५.** अर्जास कारण मी २ फेब्रुवारीला माहेरी आल्यावर घडले. मला जाबदेणार यांनी हाकलले होते. दि.०२/०२/२०२३ नंतर जाबदेणार क्र.१ ला मी बरेचदा नांदायला येण्यासाठी फोन केले आहेत. त्याचे रेकॉर्ड मी न्यायालयात दाखल केलेले नाही. मी जाबदेणार यांना नांदायला नेण्याबाबत नोटीस पाठवली नाही. माझी आजरोजी नांदायला जायची इच्छा आहे.

**१६.** मी अर्जात मला झालेला त्रास नमुद केला आहे. त्याच्या तारखा मला आज सांगता येणार नाहीत. त्याबाबत मी पोलिस ठाणेत तक्रार दिली नाही. हे खरे नाही की, मला कोणताही त्रास न झाल्याने मी तक्रार दिली नाही. दि.०२/०२/२०२३ रोजी मी पोलिस ठाणेत तक्रार दिली नाही कारण मला भिती वाटली. मी त्यानंतर तक्रार दिली नाही कारण मला वाटले जाबदेणार मला समजुन घेतील व मला न्यायला येतील. मी आज वडिलांच्या घरी राहते. हे खरे नाही की, माझे वडिल आजरोजी शेतीतुन ऊस पीक घेतात. हे खरे नाही की, माझ्या वडिलांच्या घरची परिस्थिती चांगली आहे. मी दवाखान्यातल्या आजारपणाच्या पावत्या कोर्टात दाखल केल्या नाहीत. मी मला नांदायला नेण्यासाठी वरिष्ठ न्यायालयात अर्ज केला आहे अगर कसे मला आठवत नाही. हे खरे नाही की, मला नांदायला जायची इच्छा नसल्याने मी त्याकरिता आवश्यक कोणताही प्रयत्न केला नाही. हे खरे नाही की, जाबदेणार यांची मला नांदवायची तयारी आहे. मी माझ्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रातील संपुर्ण मजकुर वाचला आहे. हे खरे नाही की, वकिलांनी लिहिलेल्या मजकुरावर मी सही केली.

**१७.** हे खरे नाही की, माझी नणंद व सासु घरातील सर्व कामे करायचे. हे खरे की, माझ्या सासुला मणक्याचा त्रास आहे. हे खरे की, डॉक्टरांनी त्यांना १५ दिवस विश्रांती घ्यायला सांगितली होती. हे खरे की, माझी सासु कोरोना काळात मणक्याच्या त्रासावर डॉ.बोबडे यांच्याकडे उपचार घेत होती. हे खरे की, त्यावेळी माझ्या माहेरच्या लोकांना कोरोना संसर्ग झाला होता. हे खरे नाही की, त्यावेळी माझ्या माहेरचे लोक माझ्या सासरी आले होते. हे खरे नाही की,

जाबदेणार यांनी माझ्या माहेरच्या लोकांना सांगुन देखील माझ्या माहेरचे लोक कोरोना संसर्ग असताना माझ्या सासरी येत होते.

**१८.** हे खरे की, माझ्या पतीची नोकरीची वेळ सकाळी ८ ते संध्याकाळी ७.३० आहे. हे खरे नाही की, त्यामुळे आमच्या घराची जबाबदारी माझ्या नणंदेवर होती. हे खरे नाही की, त्यावेळी मला काम सांगितल्यावर मी उलट बोलायचे. हे खरे नाही की, माझ्या पतीचा डबा माझी सासु व नणंद करायचे. हे खरे नाही की, मी घरातील कामे न करता सतत मित्र-मैत्रिणी व माहेरच्या लोकांशी फोनवर बोलायचे.

**१९.** हे खरे की, माझ्या सासुला मणक्याचा त्रास झाल्याने ती त्यावेळी बाथरुममध्ये जाताना आधाराने जायची. हे खरे नाही की, फेब्रुवारी २०२२ मध्ये मी सासुला शिवीगाळ करुन बाथरुममध्ये ढकलुन दिले. हे खरे नाही की, त्यावेळी मी घडलेला प्रकार सासुने सर्वांना सांगितला म्हणुन सर्व जाबदेणार यांना शिवीगाळ केली.

**२०.** जाबदेणार यांनी माझा लग्नानंतरचा वाढदिवस साजरा केला होता. हे खरे नाही की, मला वाढदिवसाला ड्रेस, सोन्याची अंगठी व घड्याळ भेट दिले होते. हे खरे नाही की, माझ्या वाढदिवसाला पाहुणे आले होते. हे खरे नाही की, जाबदेणार माझ्या सर्व इच्छा पुरवत होते. हे खरे की, सप्टेंबर २०२२ मध्ये आम्ही सर्वजण पुणे, महाबळेश्वर येथे फिरायला गेलो होतो. लग्नाआधी माझे शिक्षण १० वी झाले होते. सन २०२१ पुर्वी माझी दहावी झाली याची कागदपत्रे मी न्यायालयात दाखल करायला तयार आहे. माझा लग्नानंतर शिवण क्लासचा कोर्स झालेला नाही. माझा लग्नानंतर कोणताही कोर्स झालेला नाही.

**२१.** हे खरे नाही की, ऑक्टोबर २०२२ मध्ये मी जाबदेणार यांचेकडे वेगळे राहण्याबाबत हट्ट केला. हे खरे नाही की, त्यानंतर मी माझ्या भावाला बोलावुन पौंधवडी येथे गेले. हे खरे नाही की, त्यावेळी माझ्या भावाने माझ्या सासरच्या लोकांना धमकी दिली व तो निघुन गेला. हे खरे नाही की, जाबदेणार क्र.१ ने मला माहेरी येऊन पुन्हा नांदायला नेले. हे खरे नाही की, मी जाबदेणार यांच्याकडे वेगळे राहण्याबाबत सतत हट्ट करायचे. हे खरे नाही की, दि.३१/०१/२०२३ रोजी मी जाबदेणार क्र.१ कडे जाबदेणार क्र.२ ते ५ पासुन वेगळे राहण्यासाठी भांडण केले व माहेरी निघुन गेले. हे खरे नाही की, जाबदेणार क्र.१ ने नांदायला

येण्यासाठी बरेच प्रयत्न केले आहेत. हे खरे नाही की, त्यावेळी माझा भाऊ व माझे वडील जाबदेणार क्र.१ ला मारहाणीची भाषा वापरायचे. हे खरे नाही की, दि.११/०५/२०२३ रोजी जाबदेणार हे मला नांदायला घेऊन जायला आले होते. साक्षीदार सांगते ते मला घेऊन जायला आले होते परंतु त्यांचा पाहुणचार न झाल्याने माझ्या घरच्यांनी त्यांना राहायची विनंती केली. हे खरे नाही की, दि.११/०५/२०२३ रोजी माझ्या माहेरच्या लोकांनी व गावातील २०-२५ गुंडांनी जाबदेणार यांना घरात कोंडुन मारहाण केली व तेथुन जाबदेणार यांनी सुटका करुन दि.१२/०५/२०२३ रोजी भिगवण पोलिस ठाणेत तक्रार केली. साक्षीदार पुन्हा सांगते माझ्याविरुद्ध व माझ्या घरच्यांविरुद्ध भिगवण पोलिस ठाणेत तक्रार दाखल केली होती. हे खरे नाही की, त्या तक्रारीच्या अनुषंगाने भिगवण पोलिस ठाणेत आम्हाला बोलावले होते. **(न्यायालयीन कामकाजाची वेळ संपल्याने उलटतपास तहकुब करण्यात आला.)**

**उलटतपास तहकुब.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by PRAJKTA RAJEEV SABNIS
Date: 2025.04.02 18:23:09 +0530

**(प्राजक्ता राजीव सबनीस)**

**दि.०२/०४/२०२५**

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापूर,**
**ता.इंदापूर, जि.पुणे.**